# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## प्रकटन

**विषय : विद्यापरिषदेवर प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या दोन अध्यापकांचे आरक्षण ठरविण्याच्या सोडतीबाबत.**

या प्रकटनाद्वारे विद्यापीठाशी संबंधित सर्व घटकांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ३२(३)(छ)[32(3)(g)] अन्वये अध्यापक गटातून १५ वर्षापेक्षा कमी नसेल इतका अध्यापनाचा अनुभव असलेले प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधित्व करणारे ०२ अध्यापक, त्यापैकी एक अनुसूचित जातीची किंवा अनुसूचित जमातीची किंवा निरधिसूचित जमातीची (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमातीची किंवा इतर मागासवर्गाची व्यक्ती असेल. परंतु विद्याशाखेचे आरक्षण हे चिठ्ठया टाकून काढलेल्या सोडतीद्वारे ठरविता येईल. परंतु या खंडान्वये, प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अध्यापकांपैकी, एक अध्यापक ही चिठ्ठया टाकून काढलेल्या सोडतीद्वारे ठरविण्यात येईल, अशी महिला असेल, अशी तरतूद आहे. या तरतुदीनुसार विद्यापरिषदेवर प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या दोन अध्यापकांचे आरक्षण सोडत काढून ठरवायचे आहे.

उक्त तरतुदीनुसार विद्यापरिषदेवर प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या दोन अध्यापकांचे आरक्षण ठरविण्यासाठी **संत ज्ञानेश्वर सभागृह, मुख्य इमारत, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ** येथे शनिवार, दिनांक १० डिसेंबर, २०२२ रोजी, सकाळी ११.०० वाजता सोडत काढण्यात येणार आहे. तरी संबंधित घटकांनी याची नोंद घेऊन इच्छुकांनी चक्रक्रम सोडत काढण्याच्या वेळी उपस्थित रहावे.

(डॉ. प्रफुल्ल पवार)
कुलसचिव

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. : साफुपुविनि/२५०
दिनांक : ०९/१२/२०२२

D:\Election 2022 (Bhosale)\Teacher\Prakatan.docx